अति तात्काळ

अतिरिक्त उपलब्धी [अनिवार्य निक्षेप योजना] अधिनियम, १९७४ --
बाकी हप्त्यांची पूर्ण परतफेड

CR1988090401

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
परिपत्रक क्रमांक एमआयएस-१०८४/सीआर-३३१/सेवा-९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ४ सप्टेंबर १९८८.

## प रि प त्र क

शासन परिपत्रक, वित्त विभाग, क्रमांक एमआयएस-१०८४/सीआर-३३१/एसईआर-९, दिनांक ७ सप्टेंबर १९८७ अन्वये असे आदेश देण्यात आले होते की, आहरण व संवितरण अधिका-यांनी त्यांच्या खात्याशी/विभागाशी संबंधित असलेल्या अनिवार्य निक्षेप योजनेतील सर्व शिल्लक हप्त्यांची परतफेड कोणत्याही परिस्थितीत सप्टेंबर १९८८ पर्यन्त पूर्ण करावी व त्यांनी त्याबाबतचे काम पूर्ण झाले आहे असे प्रमाणपत्र प्रत्येक विभाग/कार्यालय यांच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या सप्टेंबर १९८८ च्या वेतन देयकाबरोबर जोडावे. असे प्रमाणपत्र न जोडल्यास, संबंधित कोषागार अधिकारी/अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई यांनी संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांची पगार देयके ऑक्टोबर १९८८ पासून रोखावीत.

२. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांना सप्टेंबर १९८९ पर्यन्त सर्व थकित हप्त्यांची परतफेड करण्यासाठी आणखी अवधी देण्यात यावा. त्यांच्या पगाराची देयके अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/जिल्हा कोषागार अधिकारी यांनी सप्टेंबर १९८९ पर्यन्त पारित करावीत. प्रत्येक विभाग/कार्यालय यांच्या आस्थापनेवरील अराजपत्रित कर्मचा-यांच्या सप्टेंबर १९८९ च्या वेतन देयकाबरोबर संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांनी वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक एमआयएस-१०८४/सीआर-४५०/एसईआर-९, दिनांक २४ मे १९८४ बरोबर जोडलेल्या नमुन्यामध्ये प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे. असे प्रमाणपत्र जर जोडले नसेल तर अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई/जिल्हा कोषागार अधिकारी यांनी संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांची ऑक्टोबर १९८९ पासून पगार देयके पारित करू नयेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

नरेंद्र कर्णिक,
शासनाचे उप सचिव.

प्रति

[१] महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई [१६० प्रती],
[२] महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर [४० प्रती],

[कृ.मा.प.]

शाममु-रोटा-विवि-एच-५५४[१०,०००-१०-९-८८]

[३] महालेखापाल, [वैधानिक व वाणिज्य], मुंबई [४० प्रती],
[४] अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
[५] संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
[६] निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
× [७] सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
× [८] सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
× [९] प्रबंधक, मूळ न्याय शाखा, महाराष्ट्र राज्य, उच्च न्यायालय, मुंबई,
× [१०] प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांची कार्यालये, मुंबई,
× [११] मुख्य लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई,
[१२] मुख्य मंत्र्यांचे सचिव,
[१३] मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
[१४] राज्यपालांचे सचिव,
[१५] विभागीय आयुक्त, मुंबई/पुणे/औरंगाबाद/नागपूर/नाशिक/अमरावती,
[१६] मंत्रालयीन सर्व विभाग,
[१७] मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागांच्या अधीनस्त असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,
[१८] विशेष आयुक्त, महाराष्ट्र सदन, कोपर्निकस रोड, नवी दिल्ली,
[१९] सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
[२०] वित्त विभागातील सर्व कार्यासने.

---

× पत्राने.

एच-५५४[१०,०००-१०-९-८८]-३